Light of Life Trust

# लाईट ऑफ लाईफ टाईम्स

खंड. १७ एप्रिल २०२२

## आमचे ध्येय

***गरिबीचे पिढ्यानपिढ्याचे चक्र खंडित करा, एका वेळी एक जीवन.***

१५+ वर्षांमध्ये आम्ही ग्रामीण भारतातील ३,४४,८७४ हून अधिक जवीनांवर परिणाम केला आहे. आमचे उपक्रम संपूर्ण शिक्षण, समुदाय आणि कौशल्य विकास, आरोग्य सेवा आणि पर्यावरण संवर्धन आमच्या प्रमुख प्रकल्पांद्वारे आहेत–आनंदो आणि जागृती.

## आमचे संचालक मंडळ

- **मा. विली डॉक्टर** – संस्थापक आणि व्यवस्थापक
- **मा. सुश्री गायत्री रुईया** – विश्वस्त
- **मा. मनोज मुरारका** – विश्वस्त
- **मा. जितेंद्र मेहता** – विश्वस्त
- **मा. पुनित बी. आनंद** – विश्वस्त
- **मा. ॲश्दीन डॉक्टर** – विश्वस्त

amazonsmile
You shop. Amazon gives.

अमेझोन तुमच्या पात्र अमेझोन स्माईल खरेदीच्या किंमतीपैकी ०.५ % तुमच्या पसंतीच्या धर्मादाय संस्थेला दान करते. **QR कोड स्कॅन करून** लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला सपोर्ट करा किंवा खालील लिंकला भेट द्या.
**http://smile.amazon.com/ch/20-5402443**

## LOLT ला १७ वर्षे पूर्ण झाली !



**२३ मार्च हा लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचा स्थापना दिवस आहे. सामाजिक विकास क्षेत्रातील गौरवशाली १७ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या प्रादेशिक केंद्रे आणि मुख्य कार्यालयाने हा विशेष सोहळा साजरा केला.**







## शिक्षणासाठी धावा – LOLT ची पहिली आंतरराष्ट्रीय व्हर्चूअल मॅरेथॉन – २०२२




२९ आणि ३० जानेवारी २०२२ रोजी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने CYRUNS सह भागीदारीमध्ये पहिली आंतरराष्ट्रीय व्हर्चूअल मॅरेथॉन २०२२– रन फॉर एज्युकेशन आयोजित केली.

या शर्यतीसाठी ७००० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सहभागिंनी नोंदणी केली. या मॅरेथॉनची थीम 'मी धावतो, ते शिकतात' होती. ग्रामीण मुलांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या जीवनात शिक्षणाच्या महत्वाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि सामान्य लोकांमध्ये ही जागरूकता वाढवण्यासाठी सहभागींचा पाठिंबा मिळविणे हा यामागील उद्देश होता.

२९ जानेवारी रोजी सकाळी ६:०० वाजता LOLT च्या संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती विली डॉक्टर यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. LOLT लाभार्थी आणि इतरांनी लहान गटांमध्ये किंवा वैयक्तिकरित्या त्यांच्या स्थानिक भागात मॅरेथॉन धावली आणि या प्रसंगासाठी खास तयार केलेल्या लिंकवर त्यांच्या संदेशांचे छोटे व्हिडिओ पाठवले.

## टॉप १० विश्वासार्ह एनजीओच्या यादीमध्ये लाईट ऑफ लाईफ ट्रस्टची वैशिष्ट्ये


GiveIndia's Blog

**10 credible NGOs in Mumbai changing lives of the poor**

- V Kumara Swamy 1 month ago

5. Light of Life Trust

Established in 2002, the organisation's vision is to transform the lives of the underprivileged. It runs various projects to support single parents, orphan children and youth and women from rural communities of India and their holistic development.

Light of Life Trust

One of them is Project Anando, which is working for reinstating and sustaining school dropouts and equipping the youngsters with skills to live and thrive in society. Its Project Jagruti supports holistic development of the underprivileged in rural areas through skill and livelihood training, providing healthcare, and conserving the environment.

व्ही कुमारा स्वामी यांच्या 'मुंबईतील गरीबांचे जीवन बदलणाऱ्या १० विश्वासार्ह एनजीओ' या शीर्षकाच्या ब्लॉगमध्ये गिव्हइंडियाने लाइट ऑफ लाईफ ट्रस्टला मुंबईतील सर्वाधिक विश्वासार्ह एनजीओच्या टॉप १० यादीत स्थान दिले आहे.

तुम्ही या लिंकवर अधिक वाचू शकता: **https://www-giveindia-org.cdn.ampproject.org/c/s/www.giveindia.org/blog/10-credible-ngos-in-mumbai-changing-the-lives-of-poor/amp/**

## उत्कृष्ट कामगिरी




**कु. वैष्णवी रामकृष्ण अहेवार, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टची आनंदो प्लस** विद्यार्थिनी पारडी टकमोर केंद्र, वाशिम जिल्हा सहभागी झाली,

★ ३ जानेवारी २०२२ रोजी रोटरी क्लब ऑफ़ खामगाव द्वारे आयोजित खामगाव मॅरेथॉन धावण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत ती १० किमी शर्यती प्रकारात द्वितीय आली आणि तिला रोटरी क्लब ऑफ खामगाव तर्फे ५०००/– ची रक्कम पुरस्कृत करण्यात आली.

★ २७ मार्च २०२२ रोजी नागपूर मॅरेथॉन. ती १० किमी धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय आली आणि तिला ट्रॉफीसह १५०००/– ची रक्कम देवून गौरवण्यात आले.



**लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या हर्सूल केंद्र, यवतमाळ जिल्ह्याचा विद्यार्थी कु. कशिश वानखेडे** हीने एपीजे अब्दुल कलाम स्पोर्ट्स अकादमी, दिग्रस, यवतमाळ जिल्ह्यातील धावण्याच्या स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले. तिला पदक, प्रमाणपत्र आणि ३०००/– चे टोकन बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.

## आम्हाला तुमचा अभिमान आहे!




लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला हे जाहीर करताना अभिमान वाटतो की, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या मनोरा केंद्रातील आनंदो प्लस विद्यार्थिनी, वाशिम जिल्ह्यातील कु. अंकिता वाघमारे हिची पुण्यातील दौड येथील पोलीस विभागात पोलीस हवालदार म्हणून नियुक्ती झाली आहे. सरकारी नोकरी मिळवणारी ती तिच्या समाजातील पहिली व्यक्ती आहे.



लाईट ऑफ लाईफ ट्रस्टला हे जाहीर करताना खरोखरच अभिमान वाटतो की, मोहिली केंद्र, रायगड जिल्ह्यातील आनंदो प्लसच्या लाभार्थी कु. हर्षाली घरत यांना क्लस्टर ऑप्टोमेट्रिस्ट या पदावर पदोन्नती मिळाली आहे. ती लेन्सकार्टमध्ये ऑप्टोमेट्रिस्ट म्हणून रुजू झाली आणि ही रँक मिळवण्यासाठी तिने गेल्या काही वर्षांपासून परिश्रमपूर्वक आणि वचनबद्धतेने काम केले आहे. आता पुणे शहरातील ८ लेन्सकार्ट आउटलेटच्या कामगिरीची जबाबदारी तिच्यावर आहे. हर्षालीला तिचे इ.डल पूर्ण करण्यासाठी LOLT चे भागीदार चान्स ऑफ लाईफ, जर्मनीने ऑप्टोमेट्री कोर्समध्ये आणि तिच्या व्यावसायिक आणि वैयक्तिक प्रवासात पुढे जाण्यासाठी पाठिंबा दिला.

## युवा महोत्सव




लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने फेब्रुवारी महिन्यात महाराष्ट्र राज्यातील सर्व सहा विभागांसाठी आनंदो प्लस लाभार्थ्यांसाठी वार्षिक कार्यक्रम आयोजित केला होता. आनंदो प्लस लाभार्थ्यांसाठी त्यांची कौशल्ये प्रदर्शित करण्यासाठी हे एक व्यासपीठ आहे. फोटोग्राफी स्पर्धा, ब्लॉग लेखन, वादविवाद आणि व्हिडीओ मेकिंग स्पर्धा यासारखे उपक्रम घेण्यात आले ज्यामध्ये सर्व विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यंदा पहिल्यांदाच हा कार्यक्रम व्हर्चूअली आयोजित करण्यात आला. यामध्ये सर्व सहभागींना त्यांचे कार्य एका मोठ्या आणि एकात्मिक व्यासपीठावर प्रदर्शित करण्यास मदत झाली आणि स्पर्धेसाठी जोश वाढवला.


आपलं कर्जत

लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आयोजित राज्यस्तरीय युवा महोत्सव २०२२ जल्लोषात साजरा

छायाचित्रण,ब्लॉग लेखन,वादविवाद आणि व्हिडिओ मेकिंग स्पर्धांचा सहभाग


कर्जत वार्ता

निर्भीड स्पष्ट

संपादक:प्रशांत ना खराडे

लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आयोजित राज्यस्तरीय युवा महोत्सव जल्लोषात साजरा

**Light of Life Trust partnership with Bill Desk and now LIVE on the Bill Pay tab with 47 banks.**

DBS | DCB BANK | HDFC BANK | IndusInd Bank | kotak | standard chartered | YES BANK

## भारत एडटेक इनिशिएटिव्हसाठी सत्त्वा कन्सल्टिंगसोबत भागीदारी



लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने BYJU'S नॉलेज पार्टनर सोबत भारत एडटेक इनिशिएटिव्हच्या अंमलबजावणीसाठी सत्व कन्सल्टिंगसोबत सहयोग केले आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे १२०० आनंदो विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रादेशिक भाषांमधील अभ्यासक्रमातील सामग्री उपलब्ध होत आहे.

१० मार्च २०२२ रोजी, सत्त्व कन्सल्टन्सीचे सहयोगी सल्लागार श्री. सुवोदीप साहा यांनी LOLT च्या बेलोशी आणि बोर्ली केंद्र, अलिबाग येथे भेट दिली आणि परिसरातील शाळांच्या मुख्याध्यापक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

## माउंट लिटेरा स्कूल इंटरनॅशनल विद्यार्थ्यांची भेट



२६ फेब्रुवारी २०२२ रोजी, माउंट लिटेरा स्कूल इंटरनॅशनल मधील १५ विद्यार्थ्यांनी जीवन आशा कम्युनिटी सेंटर, तिवरे, कर्जत येथे भेट दिली. या भेटीचे आयोजन करण्यामागे शाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना ग्रामीण वातावरणाची ओळख करून देणे, ग्रामीण शाळांना भेट देणे आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधणे हा होता. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने शिक्षण आणि कौशल्य विकासात कोणते काम केले आहे हे समजून घेण्याची संधीही यामुळे विद्यार्थ्यांना मिळाली.

## संगणक व विज्ञान प्रयोगशाळेचे उद्घाटन





९ मार्च २०२२ रोजी लायन्स क्लब ऑफ (बॉम्बे) गेटवे आणि ग्रीनलॉन्स हायस्कूल वर्ग १९७७ च्या माजी विद्यार्थी 'हेल्पिंग हँड्स' च्या सहकार्याने लाईट ऑफ लाईफ  ट्रस्टने ASEP शाळा, बालगंगा विद्यामंदिर चुनाभट्टी जिते, पेण येथे विज्ञान आणि संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन केले. लायन्स क्लबचे १८ सदस्य, Ln. मौशमी लोखंडवाला, लायन्स क्लब ऑफ बॉम्बे गेटवेच्या अध्यक्षा, Ln. स्मिता शहा, लायन क्लब ऑफ बॉम्बे गेटवेचे विश्वस्त, Ln. दीपा कपूर, ग्रीनलॉन्स हायस्कूलच्या प्रतिनिधी, मुख्याध्यापक, SMC चेअरमन, शिक्षक, संबंधित शाळेचे पालक प्रतिनिधी, जिते गावच्या उपसरपंच, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या सीओओ श्रीमती. कमल दमनिया आणि LOLT टीम सदस्य या कार्यक्रमात सहभागी झाले होते.







## फोटोग्राफी कार्यशाळा




श्री. सुदर्शन म्हसकर, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे खांडस केंद्राचे लाभार्थी ज्यांनी पत्रकारिता आणि जनसंपर्कमध्ये बी. ए. पूर्ण केले त्यांनी फोटोग्राफीवर ऑनलाइन कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेचा अलिबाग, जालना, वाशीम, नंदुरबार आणि कर्जत विभागातील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या १०० आनंदो प्लस लाभार्थ्यांना लाभ झाला.

## महिला दिनाचा उत्सव

तळोदा येथील लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट स्किलिंग सेंटरने ८ मार्च रोजी शिवणकाम व ब्युटी पार्लर प्रशिक्षण कार्यक्रमाच्या ९९ लाभार्थींना शिवणकाम व ब्युटी पार्लर किट व प्रमाणपत्रांचे वाटप करून महिला दिन साजरा केला. महात्मा फुले कॉलेज ऑफ सोशल वर्कच्या श्रीमती. लीना वाणी यांनी या कार्यक्रमाचे स्वागत केले.

धसई, मुरबाड येथील लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट स्किलिंग सेंटरच्या वतीने मुरबाडमध्ये प्रथमच महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सामान्य आरोग्य शिबिराबरोबरच १६० महिलांसाठी विविध एक मिनिटांचे खेळ, काही नृत्य आणि फॅन्सी ड्रेस स्पर्धा घेण्यात आली. धसई केंद्रात कौशल्य-आधारित प्रशिक्षणानंतर स्वतःचा लघुउद्योग सुरू करण्यासाठी मार्गदर्शन केलेल्या १० यशस्वी महिलांचा विशेष सन्मान आणि सत्कार कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता.

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने गोदरेज आणि बॉयसच्या भागीदारीत जीवन आशा कम्युनिटी सेंटर, तिवरे, कर्जत येथे महिला दिन साजरा केला. गोदरेज आणि बॉयसच्या ३५ कर्मचाऱ्यांनी तसेच ४५ मुली आणि महिला लाभार्थींसह भाग घेतला. अनेक उपक्रम आयोजित केले गेले ज्यामध्ये दोन्ही संघांचा सक्रिय सहभाग दिसला. लाईट ऑफ लाईफ ट्रस्टचे सीईओ श्री. रमेश दासवानी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.






## वसंत पंचमी कार्यक्रम



फ्लॉवरिंग ट्री Inc., USA सह भागीदारीतील अनंत कार्यक्रमाच्या अंतर्गत, लाईट ऑफ लाईफ ट्रस्टने कर्जत येथे ५ फेब्रुवारी २०२२ रोजी वसंत पंचमी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हा कार्यक्रम दरवर्षी आयोजित केला जातो जेथे अनंत विद्यार्थी लोकांच्या जीवनात आशा आणि आनंद आणणाऱ्या वसंत ऋतूच्या आगमनाचा उत्सव साजरा करतात. अनंतचे विद्यार्थी आणि टीम सदस्यांकडून करण्यात आलेले काही अप्रतिम आणि चित्तवेधक परफॉर्मन्स प्रेक्षकांना पाहण्यास मिळाले.

## ओरल हेल्थ डे साजरा



२१ मार्च २०२२ रोजी मौखिक आरोग्य दिनानिमित्त कर्जत येथील लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या MMU टीमने येरळा मेडिकल ट्रस्टच्या डेंटल कॉलेज आणि हॉस्पिटलच्या सहकार्याने दंत आरोग्य आणि स्वच्छता या विषयावर जनजागृती सत्र आणि सर्व सहभागींसाठी मोफत दंत तपासणी शिबिरांचे आयोजन केले होते. डॉ. कार्तिक, डॉ. ऐश्वर्या आणि डॉ. दिव्या यांच्यासह पीरियडॉन्टोलॉजी विभागातील पदव्युत्तर विद्यार्थी आणि इंटर्न यांनी दंत आरोग्य आणि स्वच्छता यावर जागरूकता सत्र आयोजित केले. ४६ लाभार्थ्यांनी दंत तपासणी शिबिराचा लाभ घेतला.

## संपर्क

### मुख्य कार्यालय
वन बीकेसी, सी-विंग, युनिट क्रमांक: १५१९, प्लॉट नं.: सी-६६,
जी-ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पु),
मुंबई - ४०० ०५१. दूरध्वनी: +९१ २२ ६९०४ ७४७०
ईमेल: connect@lightoflifetrust.org

### शाखा कार्यालये:
**महाराष्ट्र :** अहमदनगर • अकोला • अलिबाग • जालना • कर्जत • माणगाव • मुंबई • मुरबाड • नंदुरबार • वाशिम • यवतमाळ
**मध्य प्रदेश :** सिवनी **राजस्थान :** बिजोलिया
**ओडिशा :** अंगुल

www.lightoflifetrust.org +91-9820229445

@LightOfLifeTrustIndia @lightoflifetrust_lolt @lightoflifetrst lightoflifetrust youtube.com/c/lightoflifetrust

## सॅनिटायझर वाटप कार्यक्रम



लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या मुरबाड आणि कर्जत येथील MMU ने रोटरी क्लब ऑफ मुंबई, मुलुंड - पूर्व यांच्या सहकार्याने PHC, RH, ZP शाळा, आशा वर्कर्स आणि अंगणवाडी सेविकांसाठी सॅनिटायझर वाटप कार्यक्रम आयोजित केला होता. १०५ लाभार्थ्यांना आयुर्वेदिक सॅनिटायझरच्या २८७ बाटल्यांचे वाटप करण्यात आले.

श्रीमती. अनीता ढमढेरे, विस्तार अधिकारी, श्रीमती. रजनी सोनवणे, ICDS पर्यवेक्षिका कडाव-१ आणि २ बीट, श्रीमती. वनिता पडलकर, ICDS कार्यालय कर्जत येथील ICDS पर्यवेक्षिका आंबिवली-१ आणि मोहिली बीट यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला.

**Contribute to Light of Life Trust on Paytm**
**Make online contribution to Light of Life Trust.**
Contribute Now ! Paytm
https://m.paytm.me/LOLT